# ॥गणपती अथर्वशीर्ष॥

# ॥रामरक्षा॥

# ॥पुरुषसूक्त॥

# ॥श्रीसूक्त॥

# ॥विष्णुसूक्त॥

मराठी समश्लोकानुवाद

शशिकांत भगवान कोंडेजकर

# *॥गणपती अथर्वशीर्ष॥*

# *॥रामरक्षा॥*

# *॥पुरुषसूक्त॥*

# *॥श्रीसूक्त॥*

# *॥विष्णुसूक्त॥*

## मराठी समश्लोकानुवाद

शशिकांत भगवान कोंडेजकर

प्रकाशन व वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

अनुवादक : **शशिकांत भगवान कोंडेजकर**

sbkondejkar@yahoo.com

फोन नंबर. 9960241617

प्रकाशक : **ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : २६ ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan® 2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.




श्री शशिकांत कोंडेजकर यांनी मराठीत समश्लोकी लिहीलेली श्रीमद्भगवद्गीता खालील लिंकवर उपलब्ध आहे

http://www.esahity.com/2309234323812351236623402381 2350.html

## दोन शब्द

रामरक्षा आपण लहानपणापासून म्हणत आलो आहोत. तसेच आपल्या नित्य श्रवण आणि पठणात अथर्वशीर्ष पुरुषसूक्त देवीसूक्त आदी वेगवेगळी स्तोत्रे येत असतात. त्यांच्या अर्थासह पुस्तिका बहुतेकांच्याकडे असतात. (श्री. शांताराम मोघे यांचे गणपती अथर्वशीर्ष व सौ. अनुराधा मोघे यांचे रामरक्षा या पुस्तिका तसेच सार्थ पुरुषसूक्त मानसी प्रकाशन यांची पुस्तिका उपलब्ध आहे. श्री र.शं.घाटे यांनी श्रीरामरक्षा रहस्य हे फार सुंदर पुस्तक लिहिले आहे त्यात रामरक्षेचा अर्थ विस्ताराने उलगडला आहे. तसेच श्री दंडगे यांची श्रीसूक्त ही अर्थ व विवेचनासह पुस्तिका माझ्याकडे आहे.) तसेच हल्ली आंतरजालावरही बरेच साहित्य उपलब्ध असते. या व अशा पुस्तकांमुळे ही स्तोत्रे समजणे सोपे गेले. मूळ संस्कृतमध्ये ती लयीत म्हणणे कानाला आणि मनाला समाधान देतात. तीच अर्थ समजून म्हणणे अधिक उत्तम म्हणून मला ही मराठीत स्वान्तसुखाय पद्यरूपात करावीशी वाटली. आता श्री. सुनीळ सामंत यांच्या प्रोत्साहनाने व सौजन्याने मराठीतल्या या विशाल "ई-साहित्य" या संकेतस्थळावर आपणा सर्वांसाठी प्रसिध्द होत आहे. ज्यांना संस्कृत समजणे कठीण त्यांनाही ही मराठीत पद्यरूपात वाचतानाच अर्थही समजल्यास त्यात रुची उत्पन्न होईल अशी अपेक्षा आहे. हे पद्यानुवाद लयीत करण्याचा हा प्रयत्न कितपत यथार्थ झाला आहे ते आपणच ठरवावे. यात जे बरोबर उतरलेत ते वर उल्लेखलेल्या लेखकांमुळे मला शक्य झाले आहे, त्यांच्यामुळे सरल अर्थ मला समजला. काही असंबध्द असल्यास तो माझा दोष आहे. असे दोष आपण निदर्शनास आणुन दिले तर हे पुस्तक आपण अधिक निर्दोष करू.

आपला

श.भ.कोंडेजकर

कोथरूड, पुणे ४११०३८

चलध्वनी (मोबा.) ९९६०२४२१६१७/ इ-मेल- sbkondejkar@yahoo.com

# ।।पुरूषसूक्त।।

सहस्रशीर्षा पुरुषः
सहस्राक्षः सहस्रपात्
स भूमिं विश्वतो वृत्वा
ऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥१॥
पुरुष एवेदं सर्वं
यद्भूतं यच्च भव्यम् ।
उतामृतत्वस्येशानो
यदन्नेनातिरोहति ॥२॥

देहाच्या गावी त्याचा असे वास ।
हजारो मस्तके, नेत्र पाद त्यास ।।
आदिपुरुष सर्वात्मा व्यापतो सर्वांस ।
उरतो तो दशांगुळे व्यापुनी भूमि विश्र्वास।।१।।
याचि पुरुषरूपात विलसे पहा तिन्ही काळ ।
वर्तमान भूत अणि तसाच भविष्यकाळ ।।
अमृतातील जे तत्त्व त्याचा हाच स्वामी जाण ।
अन्नाधारे जे वाढे त्या जगताचा धनी जाण ।।२।।

एतावानस्य महिमातो
ज्यायाँश्च पूरुषः ।
पादोऽस्य विश्वा भूतानि
त्रिपादस्यामृतं दिवि ॥३॥
त्रिपादूर्ध्व उदैत्पूरुषः
पादोऽस्येहाभवत्पुनः ।
ततो विष्वङ् व्यक्रामत्
साशनानशने अभि ॥४॥

झालेले असलेले होणारे वा हे जगत ।
ही त्याचीच शक्ती हे सर्व जाणतात ।।
पुरुष याहून थोर हा भाग एक चतुर्थ ।
याहून तीन अधिक अविनाशी स्वर्गात ।।३।।
अज्ञान त्रिगुणाहून त्रिपादी राही अलिप्त ।
एकाच चतुर्थांशात जग होई पुनरावृत्त ।।
याच अंशाने जाणा चराचर सर्व व्याप्त ।
ब्रम्हरुप पुरुष मात्र संसारातून अतीत ।।४।।

तस्माद्विराळजायत
विराजो अधि पूरुषः ।
स जातो अत्यरिच्यत
पश्चाद्‌भूमिमथो पुरः ॥५॥
यत्पुरुषेण हविषा
देवा यज्ञमतन्वत ।
वसन्तो अस्यासीदाज्यं
ग्रीष्म इध्मः शरद्धविः॥६॥

त्याच आदिपुरुषाने धरिले स्वदेहास ।
माया राहिली पहा धरुनि त्या देहास ।।
निर्मिले ब्रह्मांड त्यात जीवाचे धाम केले ।
देव मानव पशू देह धरेसह धरिले ।।५।।
देवांनी याच पुरुषाचे हविर्भाग कल्पिले ।
मनोयज्ञात त्यात वसंता आज्य मानिले ।।
यज्ञातील समीधा ही ऋतू ग्रीष्मचि पाहिला ।
शरद ऋतू हाच यज्ञ पुरोडाश मानिला ।।६।।

तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षल्
पुरुषं जातमग्रतः ।
तेन देवा अयजन्त
साध्या ऋषयश्च ये ॥७॥
तस्माद्यज्ञात्सर्वहुतः
सम्भृतं पृषदाज्यम् ।
पशून्ताँश्चक्रे वायव्या
नारण्यान् ग्राम्याश्च ये ॥८॥

आदिपुरुषाने केले कुशाग्रांनी प्रोक्षण ।
त्यातून जन्मले पहा देव ऋषि साध्यगण ।।
या महा यज्ञास आरंभिले सर्व देवांनी ।
सृष्टीरूप यज्ञाला तसे ऋषि साध्यगणांनी।।७।।
संपूर्ण याच यज्ञाचे पहा काय फलित ।
तूप मिश्रित दही त्यातून जाहले प्राप्त ।।
आकाशगामी वननिवासी पक्षी आणि पशू जसे।
गौ अश्र्वादि प्राणीही उद्भवले पहा तसे ।।८।।

तस्माद्यज्ञात्सर्वहुत
ऋचः सामानि जज्ञिरे ।
छन्दांसि जज्ञिरे तस्माद्-
-यजुस्तस्मादजायत ॥९॥
तस्मादश्वा अजायन्त
ये के चोभयादतः ।
गावोः ह जज्ञिरे तस्मात्
तस्माज्जाता अजावयः॥१०॥

पूर्णाहुती होताच त्या यज्ञातून पहा ।
ऋग्वेदातील उत्पन्न जाहल्या पहा ।।
छंद साम गायनासाठी त्यातून निर्मिले जसे ।
वेद तिसरा यजुर्वेद निर्माण त्याचेही तसे ।।९।।
त्याच यज्ञातून पहा वारूही जन्मले असे ।
त्यांच्यासम दंतधारी अन्य पशूही तसे ।।
गोधने खिल्लारे महिषी यांचाही जन्म तेथे ।
तसेच मेंढरे शेळ्या पाळीव पशू तेथे ।।१०।।

यत्पुरुषं व्यदधुः
कतिधा व्यकल्पयन् ।
मुखं किमस्य कौ बाहू
का ऊरू पादा उच्येते ॥११॥
ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्
बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः
पद्भ्यां शूद्रो अजायत ॥१२॥

कल्पिला सर्व देवांनी जेव्हा विराट हा असा ।
काय काय कल्पिले त्यांनी कोण जन्मला कसा।।
वदन विराटाचे ते कशाचे द्योतक असे ।
हात मांड्या पायातून कोण जन्मला कसे।।११।।
वदन ब्रह्माला जाणे तेच ब्राह्मण कल्पिले ।
शूर वीर बाहूबली क्षत्रीय बाहू जाहले ।।
वणिक वाणी व्यापारी मांड्यांतून जन्मले ।
सेवेकरी बलूते ते पायातून निघाले ।।१२।।

चन्द्रमा मनसो जात-
-श्चक्षोः सूर्यो अजायत ।
मुखादिन्द्रश्चाग्निश्च
प्राणाद्वायुरजायत ॥१३॥
नाभ्या आसीदन्तरिक्षं
शीर्ष्णो द्यौः समवर्तत ।
पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्
तथा लोकाँ अकल्पयन् ॥१४॥

विराट पुरुषाचे मन तोच चंद्र धारिला ।
नयनातून त्याच्या तेज सूर्य प्रकटला ।।
मुखातून त्याच्या उद्भव इंद्र अग्नीचा ।
वायू हा प्रभव पहा प्राणशक्तीचा ।।१३।।
नाभीतून निर्माण केले अंतरिक्ष आकाशाच□ ।
मस्तक आणि पाय मूळ स्वर्ग आणि भूमिचे ।।
पूर्व पश्चिमादि दिशा कर्णातून निर्मिल्या पहा ।
भू आदि सात लोकाचे प्रकटन तसे पहा ।।१४।।

सप्तास्यासन् परिधय-
-स्त्रिः सप्त समिधः कृताः ।
देवा यद्यज्ञं तन्वाना
अबध्नन्पुरुषं पशुम् ॥१५॥
यज्ञेन यज्ञमयजन्त
देवास्तानि धर्माणि
प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः
सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति
देवाः ॥१६॥

छंद गायत्री आदि सात वेद वेदिका पहा ।
वर्षाचे महिने बारा ऋतू गणिले सहा ।।
स्वर्ग मृत्यु पाताळ मिळूनि समिधा पहा ।
या यज्ञी बांधिले या विराटा पशू तो पहा ।।१५।।
असे ब्रह्मादि देवांनी मानसयज्ञे पूजिले ।
जगताला धारण्याला धर्मकार्या मिळविले ।।
चिदाकाश विश्वचालक विराटा त्या चिंतिले ।
त्यावेळी ते साध्यगण देवस्वरूप जाहले ।।१६।।

# ॥श्रीसूक्त॥

॥श्री महाकाली महालक्ष्मी महासरस्वती देवताभ्यो नमः॥

हिरण्यवर्णामिति पंचदशर्चस्य सूक्तस्य

आनंदकर्दमचिक्लीतेन्दिरासुता ऋषयः।

श्रीरग्निर्देवते। आद्यस्तिस्रोऽनुष्टुभः ।

चतुर्थी बृहती।

पंचमीषष्ठ्यौ त्रिष्टुभौ ।

ततोऽष्टावनुष्टुभः ।

अंत्या प्रस्तारपंक्तिः ।

श्रीमहालक्ष्मीप्रीत्यर्थं

न्यासे/जपे/अभिषेके/हवने विनियोगः।

।।नमस्ते श्री महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती देवी।।

हिरण्यवर्णादि पंधरा ऋचा । यांची ऋषीनामे घेतो साचा।।

आनंद, कर्दम, चिक्लीत। तसेच ते इंदिरासुत।।

श्री अग्नी देवता जाण । आता छंद ऋचांचे जाण।।

अनुष्टुभ पहिले तीन । चवथा बृहती जाण।।

त्रिष्टुभ ते पाच सहा । आठ अनुष्टुभ पहा।।

पंधरावा याच सूक्ती । त्याची प्रस्तारपंक्ती।।

करन्यासास अंगन्यासास । जपास अभिषेकास।।

अथवा हवन यागास ।

श्रीमहालक्ष्मीप्रित्यर्थ विनियोगास ।।

अनुष्टुभ छंदः

हिरण्यवर्णाम् हरिणीं
सुवर्णरजतस्रजाम् ।
चंद्राम् हिरण्मयीं लक्ष्मीं
जातवेदो म आ वह ।।१।।
तां म आ वह जातवेदो
लक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यां हिरण्यं विंदेयं
गामश्र्वं पुरुषानहम् ।।२।।



अनुष्टुभ छंदः

सुवर्णकांति चपळगती हरिणी ।
सुवर्ण रजत माला धारिणी ।।
चमचमती सोनपुतळी लक्ष्मी ।
जातवेदा मागतो मी ।।१।।
त्या लक्ष्मीला जी अढळ ।
जातवेदा बोलवा तुम्ही ।।
त्यायोगे गायी सोने घोडे ।
इष्टमित्रही मिळवीन मी ।।२।।

अश्वपूर्वाम् रथमध्यां
हस्तिनादप्रबोधिनीम् ।
श्रियं देविमुपह्वये
श्रीर्मा देवीजुषताम् ।।३।।

बृहति छंदः

कां सोस्मितां
हिरण्यप्राकारामार्द्रां
ज्वलंतीं तृप्तां तर्पयंतीम् ।
पद्मे स्थितां पद्मवर्णाम्
तामिहोपह्वये श्रियम् ।।४।।



अश्वरथी विराजे
नि गजनादे जागवे ।
आवाहितो श्रीदेवी
प्रसन्न मज व्हावे ।।३।।

बृहति छंदः

कमल वर्णी कमल निवासी
कोमला स्वर्णकांता ।
सुहासिनी सुखस्वरूपिणी
तुज बोलावितो तृप्ता ।।४।।

## त्रिष्टुभ छंदः

चंद्रां प्रभासां यशसा ज्वलन्ती,
श्रियं लोके देवजुष्टामुदाराम् ।
तां पद्मिनीमीं शरणं प्रपद्ये,
अलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे।।५।।
आदित्यवर्णे तपसोधि जातो,
वनस्पतिस्तव वृक्षोथ बिल्वः ।
तस्य फलानि तपसा नुदन्तु,
मायान्तरायाश्र्च बाह्या अलक्ष्मीः।।६।।

## त्रिष्टुभ छंदः

शशिसम शीतल ईशा सुखकर,
उदार विश्र्वविख्यात।
कमलिनी लक्ष्मी शरण तुला
मी, तुझे करी स्वागत ।।५।।
तेजस्विनी श्री तुझिया तपाने,
बिल्व तरू उद्भवे पादपात ।
मोह माया अज्ञान दैन्य माझे,
बिल्व फले ती करतील नष्ट ।।६।।

अनुष्टुभ छंदः

उपैतु मां देवसखः
कीर्तिश्च मणिना सह ।
प्रादुर्भूतो सुराष्ट्रेऽस्मिन्
कीर्तिमृध्दिं ददातु मे ।।७।।
क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं
नाशयाम्यहम् ।
अभूतिमसमृध्दिं च
सर्वाम् निर्णुद मे गृहात् ।।८।।

अनुष्टुभ छंदः

जन्मलो अहोभाग्ये,
या राष्ट्री याच योगे ।
धन कीर्ती चिंतामणी,
आणि सखे मज दे गे ।।७।।
क्षुधातृष्णेने मलीन,
अलक्ष्मी त्यागितो मी ।
त्या अभावा दूर सार,
विनवितो हे तुज मी ।।८।।

गंधद्वारां दुराधर्षां
नित्यपुष्टां करीषिणीम् ।
ईश्र्वरीं सर्वभूतानां
तामिहोपह्वये श्रियम् ।।९।।
मनसः काममाकूतिं वा
चः सत्यमशीमहि ।
पशूनां रूपमन्नस्य
मयि श्रीः श्रयतां यशः ।।१०।।

धान्य आणि गोमयगंधा,
ईश्र्वरी सदापुष्टा ।
अधिकारिणी श्रीदेवी,
आवाहितो घरी राष्ट्रा ।।९।।
धनधान्य पशूंची जाण,
वाणीत सत्य राहू दे ।
संकल्प मनोरथा पुरव,
यश श्री मज लाभू दे ।।१०।।

कर्दमेन प्रजाभूता
मयि संभव कर्दम ।
श्रियं वासय मे कुले
मातरम् पद्ममालिनीम् ।।११।।
आपः स्रजन्तु स्निग्धानि
चिक्लीत वस मे गृहे ।
नि च देविं मातरं श्रियं
वासय मे कुले ।।१२।।

कर्दमे धान्य उत्पत्ती,
करो येथ तू वसती ।
मम कुलात स्थाप तू,
श्री कमलाहारवती ।।११।।
जलाने स्निग्धता यावी,
रहावे चिक्लिता गेहे ।
आई श्री देविला तू,
आणावे मम कुले ।।१२।।

आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं
पिंगलां पद्म मालिनीम् ।
चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं
जातवेदो म आवह ।।१३।।
आर्द्रां यष्करिणीं यष्टिं
सुवर्णाम् हेम मालिनीम□ ।
सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं
जातवेदो म आवह ।।१४।।

अग्निदेवा आण मज तू,
भू लक्ष्मी सोनसळी ।
कपिला आर्द्र आनंदी,
पद्मालंकृता तडागिनी ।।१३।।
सोनपुतळी देवी,
सुवर्णमालादंडधारिणी ।
तेजस्वी आर्द्रा लक्ष्मी,
जातवेदा मज आणी ।।१४।।

प्रस्तारपंक्तिः छंदः

तां म आ वह जातवेदो
लक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो,
दास्योऽश्वान् विंदेयं
पुरुषानहम् ।।१५।।

अनुष्टुभ छंदः

यः शुचिः प्रयतो भूत्वा
जुहुयादाज्यमन्वहम् ।
सूक्तम् पंचदशर्चं च
श्रीकामः सततं जपेत ।।१६।।

प्रस्तारपंक्तिः छंदः

स्खलन नाही जिला अग्ने,
बोलाव तू ती लक्ष्मी ।
विपुल सोने गाई घोडे,
मित्र दासी मिळवीन मी ।।१५।।

अनुष्टुभ छंदः

संयमी शुध्द होऊनि,
जपाव्या पंधरा ऋचा ।
नित्य तुपाच्या हवनाने,
ज्यास श्रीची इच्छा ।।१६।।

# ॥लक्ष्मीसूक्त॥

(हे श्रीसूक्ताचे परिशिष्ट ‘लक्ष्मीसूक्त’ या नावानेही ओळखले जाते.)

पद्मानने पद्म-ऊरू
पद्माक्षी पद्मसंभवे ।
तन्मे भजसि पद्माक्षी,
येन सोख्यं लभाम्यहम् ॥१॥
पद्मानने पद्मिनी पद्म-पत्रे
पद्म-प्रिये पद्म-दलायताक्षी ।
विश्र्व-प्रिये विश्र्व-मनोनुकूले
त्वत्पाद-पद्मं मयि सन्निधत्स्व ॥२॥



कमलजे सरोजवदने,
राजीवलोचने देवी ।
अंबुजाक्षी भगवती,
सौख्य ईप्सित दे मला ।।१।।
अंबुजानने पद्मिनी,
कंजप्रिये अरविंदनयने ।
अनुकूल प्रिय जगी देवी,
तव चरण मम सदने ।।२।।

सरसिजनिलये सरोजहस्ते,
धवलकरांशुक-गन्ध-माल्य-शोभे ।
भगवति, हरिवल्लभे, मनोज्ञे,
त्रिभुवन-भूतिकरी, प्रसीद मह्यम्॥३॥
अश्र्वगायै गोदायै
धनदायै महाधने ।
धनं मे जुषतां देवि
सर्वकामाँश्र्च देहि मे ॥४॥

कमलनिवासी कमलहस्ते,
गंधपुष्पशुभ्रवसनधारिणी ।
हरिप्रिये भगवती सुंदरी,
त्रिलोक्यभाग्यदायिनी मज पाव झणी।।३।।
अश्र्व गाय आदिकाचे,
महाधन तू देते ।
इष्ट सर्व पुरवी तू,
प्रसन्न हो मज माते ।।४।।

पुत्र-पौत्रं धनं धान्यं
हस्त्यश्वादि गवे रथम् ।
प्रजानां भवसि माता
आयुष्मंतं करोतु मे ॥५॥
धनम् अग्निर्धनं वायु
र्धनं सूर्यो धनं वसुः ।
धनम् इंद्रो बृहस्पति
र्वरुणो धनमस्तु मे ॥६॥



गज अश्व रथ आणि,
गाई मुले नातवंडे ।
आयुष्य दे जगन्माते,
हेच तुजला साकडे ।।५।।
पवन पावक दिनमणी,
इंद्र वरुण बृहस्पती ।
लक्ष्मीस्वरूप ही सर्व,
दे यांची मज प्राप्ती ।।६।।

श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमा-
विधाच्छोभमानं महीपते ।
धनं धान्यं पशुं बहु-पुत्र-लाभं
शत-संवत्सरं दीर्घमायुः ॥७॥
ऋण-रोगादि-दारिद्य-
पाप-क्षुद्-अपमृत्यवः ।
भय-शोक-मनस्तापा
नश्यंतु मम सर्वदा ॥८॥

देइ वैभव प्रभव आणि,
महता स्वस्थ आयुष्य ।
धन धान्य गुरे लेकरे,
आणि दीर्घ शतायुष्य ।।७।।
भूक शोक मनस्ताप,
अपमृत्यू दारिद्याला ।
भय रोग ऋणासहित
जाऊ दे विलयाला ।।८।।

न क्रोधो न च मात्सर्यं
न लोभो नाशुभा मतिः ।
भवंति कृत-पुण्यानां
भक्त्या श्रीसूक्त-जापिनाम्॥९॥
महालक्ष्मी च विद्महे ।
विष्णुपत्नी च धीमहि ।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात ॥१०॥
॥इति लक्ष्मीसूक्तम्॥



लोभ नाही नाही हेवा,
नाही राग दुर्बुध्दी नाही ।
श्रीसूक्त भक्तिने जपे,
त्यास पुण्यफल हेच पाही ।।९।।
ज्ञात आम्हा महालक्ष्मी ।
ध्यानात सदा विष्णुपत्नी ।
प्रेरक आम्हा तीच लक्ष्मी ।।१०।।
।।इति लक्ष्मीसूक्तम्।।

(अधिक मंत्र)

विष्णु-पत्नीं क्षमां देवीं
माधवीं माधव-प्रियाम् ।
लक्ष्मीं प्रियसखीं देवीं
नमाम्यच्युत-वल्लभाम् ।।१।।
वैनतेय सोमं पिब,
सोमं पिबतु वृत्रहा ।
सोमं धनस्य सोमिनो,
मह्यं ददातु सोमिनः ।।२।।

(अधिक मंत्र)

नमस्कारितो देवी,
विष्णुपत्नी माधवी ।
लक्ष्मी अच्युतकांता,
क्षमे प्रियसखे देवी ।।१।।
सोमपान करिती देव,
इन्द्र आणि पक्षिराज ।
प्रार्थितो त्यांना मी,
अमृतधन तेच मज ।।२।।

आनंदः कर्दमः श्रीदः
चिक्लीत इति विश्रुतः ।
ऋषयः श्रियपुत्राश्च
मयि श्रीर्देवि-देवता ॥३॥
महालक्ष्मै च विद्महे, ।
विष्णु-पत्न्यै च धीमहि ।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥४॥

श्रीदेवी देवी पुत्रांच्या,
राहु दे मज कृपेत ।
आनंद कर्दम, श्रीद,
चिक्लीत नामे विख्यात ।।३।।
आहे आम्हा महालक्ष्मी ज्ञात ।
विष्णुपत्नीच सदा ध्यानात ।
लक्ष्मी राहो प्रेरणा देत ।।४।।

# ॥विष्णुसूक्त॥

ओम् अ देवा अवंतु
नो यतो विष्णुर्विचक्रमे ।
पृथिव्याः सप्तधामभिः ।।१।।
इदं विष्णुर्विचक्रमे
त्रेधा निदधे पदम् ।
समूळहमस्य पांसुरे ।।२।।

विष्णुदेवे व्यापिली अवनी सात पदी जेथ ।
रक्ष देवा आम्हासि रक्ष आम्हा तेथ ॥१॥
स्वर्ग पृथ्वी अंतरिक्षादि त्रिपदी त्रिपुटीमध्ये ।
जग सर्व स्वतेजाने व्यापिले श्रीविष्णुदेवे ॥२॥

त्रीणि पदा विचक्रमे
विष्णुर्गोपा अदाभ्यः।
अतो धर्माणि धारयन्।।३।।
विष्णोः कर्माणि पश्यत्
यतो व्रतानि पस्पशे ।
इंद्रस्य युज्यः सखा ।।४।।



जग आक्रमिले तीन पदी पालक श्रीविष्णूने ।
जगी धर्मास धारिले त्याच रक्षक विष्णुने ।।३।।
इन्द्राचा सखा विष्णु कर्मांचा साक्षी सर्व ।
म्हणूनि त्यास भजा उपासना करा सर्व ।।४।।

तद्विष्णोः परमं पदं सदा
पश्यंति सूरयः ।
दिवीव चक्षुराततम् ।।५।।
तद्विप्रासो विपन्नयवो
जागृवांसः समिंधते ।
विष्णोर्यत्परमं पदम् ।।६।।

पवित्र पावले त्याची ज्ञात्यांच्या सदा ध्यानात ।
सूर्यनेत्रचि पदे नभी तो विष्णु रमाकांत ।।५।।
जागृत विद्वान ज्ञाते सदैव त्या उपासती ।
परमपद श्रीविष्णूचे त्यास ते आराधती ।।६।।

# ।। श्रीरामरक्षा ।।

श्रीगणेशाय नमः

अस्य श्रीरामरक्षास्तोत्र मंत्रस्य।

बुधकौशिकऋषिः। श्री
सीतारामचंद्रो देवता।

अनुष्ठुप छंदः। सीता शक्तिः।

श्रीमध्दनुमान कीलकम्।

श्रीरामप्रीत्यर्थे जपे
विनियोगः।।



नमन श्री गणेशला।

रामरक्षास्तोत्र मंत्र माला।

ऋषी बुधकौशिक याचे। देवता श्रीरामचंद्र।

छंद याचा अनुष्ठुप। सीता हीच शक्तिरूप।

किल्ली पहा हनुमंत। रामजपे विनियोग।।

||अथ ध्यानम्||

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुष्यं
बध्दपद्मासनस्थं।
पीतं वासो वसानं
नवकमलस्पर्धिनेत्रं प्रसन्नं ।
वामांकारूढसीता
मुखकमलमिलल्लोचनं
नीरदाभं। नानालंकारदीप्तं
दधतमुरुजटामण्डनं रामचंद्रम्।

इति ध्यानम्।

||ध्यान कवन||

ध्यासा आजानुबाहूस,
धनुष्यधारकास,पद्मासनातल्या
त्यास ।
पीतवस्त्र धारकास, कमळाच्या पाकळीस,
स्पर्धी नेत्र प्रसन्नास।
सीता ज्याच्या वामांकास, त्या कमलवदनास,
जो पाहतो सुहास।
जटाभूषित त्यास, शोभायमान रामास,
ध्यासावे रामचंद्रास ||

चरितं रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम्।
एकैकमक्षरं पुंस□□ महापातक नाशनम्॥1॥
ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम्।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंण्डितम्॥2॥
सासितूण धनुर्बाणपाणिंनक्तं चरान्तकम्।
स्वलीलया जगत् त्रातुमाविर्भूतमजं विभुम्॥3॥
रामरक्षां पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम्।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः॥4॥

चरित्र रघुनाथाचे। शंभर कोटी श्लोकांचे।
महा पाप नाशाचे। सामर्थ्य एकाच अक्षराचे॥1॥
निळा कमलनयना। श्रीरामा आणिता ध्याना।
लक्ष्मण सीता समेत। जटाची जणुं मुकुट॥2॥
खड्ग चाप धरी हातात। राक्षसांचा करी घात।
स्वये होई अवतारित। तारावया हे जगत॥3॥
कामपूर्ता पापनाशिनी। रामरक्षा जपे ज्ञानी।
रक्षावा माथा राघवाने। भाल हे दशरथसुताने॥4॥

कौसल्येयो दृश्यौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः॥5॥
जिव्हां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवंदितः।
स्कंधौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः॥6॥
करौ सीतापतिः पातु ह्रदयः जामदग्न्यजित्।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः॥7॥
सुग्रीवेशः कटी पातु सक्खिनी हनुमत्प्रभुः
ऊरू रघुत्तमः पातु रक्षःकुल विनाशकृत॥8॥

नयनांना कौसल्यापुत्र। कर्णा प्रिय विश्र्वामित्र।
यज्ञरक्षक नासिकेस। प्रिय लक्ष्मणाचा वदनास॥5॥
रसना रक्षो विद्यानिधी। कण्ठ ज्यास भरत वंदी।
अस्त्रधारक खांद्यांना। पिनाकभंजक बाहुंना ॥6॥
सीतापती हस्त लीलया। रेणुकापुत्रविजयी ह्रदया।
धड माझे खरनाशक। नाभी जांबवंतरक्षक॥7॥
कमर स्वामी सुग्रिवाचा। जंघे देव मारुतीचा।
मांड्यांचे रक्षण कर। दानवनाशी रघुवर॥8॥

जानुनी सेतुकृत् पातु जङ्घे दशमुखांतकः।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः॥9॥

एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत्।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत्॥10॥

पातालभूतल व्योमचारिणश्छद्मचारिणः।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः॥11॥

रामेति रामभद्रेति रामचंद्रेति वा स्मरन्।
नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति॥12॥

गुडघ्यांचे सेतुनिर्माता। पोटऱ्या रावणहंता।
श्रीदाता बिभीषणा पादा। श्रीराम सर्वांगा सदा॥9॥
रामशक्तियुक्त अशी। रामरक्षा सदा पठसी।
तरी सुखी आयुष्मान। होशी विनयी पुत्रवान॥10॥
आकाश पाताळ अवनी। यावरचे दुष्टाचरणी।
रक्षिता रामनामानी। नच पाहती नयनांनी॥11॥
राम किंवा रामभद्र। स्मरता वा रामचंद्र।
मनुष्या न लागे पाप। सुख मोक्ष तया प्राप्त॥12॥

जगज्जेत्रैकमन्त्रेण रामनाम्नाभिरक्षितम्।

यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्व सिध्दयः।।13।।

वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत्।

अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम्।।14।।

आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः।

तथा लिखितवान् प्रात प्रबुध्दो बुधकौशिकः।।15।।

आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम्।

अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः।।16।।

जगज्जेता "राम" मात्र। दो अक्षरी रक्षामंत्र।

यास कण्ठात धारता। अष्टसिध्दी येती हाता॥13॥

वज्राचा पिंजराच। स्मरता हे रामकवच।

त्याचि आज्ञा अबाधित। शुभ विजय त्या प्राप्त॥14॥

स्वप्नी जसे आदेशिले। जागताच ते लिहिले।

बुधकौशिकाने पहा। रामरक्षा हीच अहा॥15॥

कल्पतरूचा बगिचा। हारक सर्व संकटाचा।

मोद जो तिन्ही लोकांस। वंदन प्रभु रामास॥16॥

तरुणौ रूपसंपनौ सुकुमारौ महाबलौ।

पुण्डरीकविशालाक्षौ
चीरकृष्णाजिनांबरौ।।17।।

फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ
ब्रह्मचारिणौ।

पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ
रामलक्ष्मणौ।।18।।

शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम्।

रक्षः कुलनिहंतारौ त्रायेतां नौ
रघूत्तमौ।।19।।

आतसज्ज धनुषाविषुस्पृशावक्षया

शृगनिषङ्गसङ्गिनौ।

रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः

पथि सदैव गच्छताम्।।20।।



तरूण रूपसंपन्न। सुकुमार बलवान।

कमलासम विशालनेत्री। वल्कले नेसली गात्री॥17॥

कंदफळे जे आहारी। जितेंद्रीय ब्रह्मचारी।

दशरथाचे जे पुत्र। रामलक्ष्मण बंधू मात्र॥18॥

अभय सर्वांना देती। धनुर्धरांत श्रेष्ठप्रति।

राक्षसांना संहारिती। रघुसूत आम्हां रक्षती॥19॥

मम रक्षो रामलक्ष्मण।

अक्षय ज्यांचे चापबाण।

मार्गी माझे रक्षण।

ऐसे सख्य विलक्षण॥20॥

संन्नध्दः कवची खड्गी चापबाणधरो युवा
गच्छन् मनोरथोऽस्माकं रामः पातु स लक्ष्मणः ॥21॥

रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली।
काकुत्स्थ पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघुत्तमः ॥22॥

वेदांतवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः।
जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥23॥

इत्येतानि जपेन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः
अश्वमेधाधिकं पुण्यं संप्राप्तोति न संशयः ॥24॥

सज्ज कवच खड्गधारी। चापबाण हाती धरी।
सखा लक्ष्मण पादचारी। राम मम रक्षण करी ॥21॥
शूर दशरथ तनय। लक्ष्मण ज्यास असे सहाय।
पूर्ण पुरुष काकुत्स्थ। कौसल्येचा जो सुत ॥22॥
वेदज्ञेय यज्ञपुरुष। असा हा पुराणपुरुष।
अगाध पराक्रमी श्रीधर। जानकीचा परमेश्वर ॥23॥
अशा अनेक नामाने। भक्त जो जपे श्रद्धेने।
अधिक अश्वमेधाहून। पावेल पुण्य तो पावन ॥24॥

रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम्।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः॥25॥
रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं
सीतापतिं सुंदरम्।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं
विप्रप्रियं धार्मिकम्।
राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं
श्यामलं शांतमूर्तिं।
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं
राघवं रावणारिम्॥26॥

पीतांबर वस्त्र धारण। पद्मचक्षू दूर्वांसम वर्ण।
या नावे स्तुती करती। संसारात ते नसती।।25।।
अग्रज लक्ष्मणाचा रघुश्रेष्ठ,
पती सीतेचा सुंदर।
दयानिधी काकुत्स्थ वंशी,
द्विजप्रिय धार्मिक गुणसागर।
शांत श्यामल नृपश्रेष्ठ,
सत्यमूर्ती दशरथबाळा।
प्रजानंदन कुलभूषणा, वंदन
दशाननशत्रू राघवाला।।26।।

रामाय रामभद्राय
रामचन्द्राय वेधसे।
रघुनाथाय नाथाय
सीतायाः पतये नमः॥27॥
श्रीराम राम रघुनन्दन राम राम।
श्रीराम राम भरताग्रज राम राम।
श्रीराम राम रणकर्कश राम राम।
श्रीराम राम शरणं भव राम राम॥28॥

राम रामभद्र आणि
सृष्टिकर्ता रामचंद्र।
रघुनाथ नाथ सर्वांचा।
सीता नाथा नमस्कार।।27।।
श्रीरामा रघुवंश आनंदकंदा रामा।
श्रीरामा भरतबंधु राम रामा।
श्रीरामा रणकठोरा राम रामा।
श्रीरामा मम आश्रय होई रामा।।28।।

श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि।
श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि।
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि।
श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥29॥

माता रामौ मत्पिता रामचन्द्रः।
स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः।
सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुर्नान्यं
जाने नैव जाने न जाने ॥30॥

श्रीराम पादयुगुलां स्मरतो मने मी।
श्रीराम पादयुगुलां स्तवतो जिव्हे मी।
श्रीराम पादयुगुलां नमितो शिरे मी।
श्रीराम पादयुगुलां शरण सदा मी।।29।।
राम माता माझा पिता रामचंद्र।
राम स्वामी माझा सखा रामचंद्र।
सर्वस्व माझे दयाळू रामचंद्र।
जाणे न अन्य नच अन्य काही।।30।।

दक्षिणे लक्ष्मणो यस्य
वामे तु जनकात्मजा।
पुरतो मारुतिर्यस्य
तं वंदे रघुनन्दनम्।।३१।।

लोकाभिरामं रणरङ्गधीरं,
राजीवनेत्रं रघुवंशनाथम्।
कारुण्यरूपं करुणाकरं तं,
श्रीरामचन्द्रं शरणं प्रपद्ये।।32।।

बाजूस लक्ष्मण उजव्या,
डावीकडे जनककन्या ।
मारुती पुढा सेवेस,
वंदन त्या रघुनंदना ।।३१।।
जनाचा संतोष रणी वीर खास।
स्पर्धा नेत्र कमलास नाथ रघुवंशास।
दया महासागर खास मूर्तिमंत करूणारस।
शरण जाऊ या त्यास श्रीश्री रामचंद्रास।।32।।

मनोजवं मारुततुल्यवेगं,
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं,
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।33।
कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम्।
आरुह्य कविताशाखां
वन्दे वाल्मिकि कोकिलम्।।34।।
आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम्।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम्।।35।।

मनोगामी वायुवेगी विशिष्ठ,
जितेंद्रिय बुध्दिमंतात ज्येष्ठ।
पवनसूत वानरात श्रेष्ठ
श्रीरामदूतास मी एकनिष्ठ ॥३३॥
काव्यशाखेवरून, सुमधूर करी कूजन।
राम राम वाल्मिकि, तयास माझे वंदन ॥३४॥
हारक संकटाचा दाता सर्व संपदेचा ।
आनंद जो जनाचा, श्रीरामा नमन साचा ॥३५॥

भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम्।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥36॥

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे।

रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः।

रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं।

रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुध्दर ॥37॥

राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे।
सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥38॥

भवमूळ दहनास मिळवण्या धनसुखास ।
भिवविण्या यमदूतास ,करा राम गर्जनेस ॥३६॥
सदा विजयी राजश्रेष्ठ राम,  राम ईशास पूजन ।
रामाने मारिली रक्षसेना त्यास त्या रामास वंदन ॥
रामाविण दुजा न आधार,  रामाचा मी सेवक।
राहो सर्वकाळ चित्त रामास, राम मम उध्दारक॥३७॥
रमे सुंदरे मी जाण,  या राम नामी सदा।
राम सहस्रनाम जाण,  मनोरमचि सर्वदा ॥३८॥

इति श्रीबुधकौशिकविरचितं
श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम्।

।।श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु।।

बुधकौशिके रचले श्रीरामरक्षा स्तोत्र।
सद्गुरुकृपे लिहिले माझे निमित्तमात्र।।
बुधकौशिके रचित अनुवादे शशिकांत।
आहे भगवानसुत सुव्रतांचा अंकित।।

।।श्री सीतारामचंद्रा अर्पण।।

# ॥श्री गणपती अथर्वशीर्ष॥

अथ श्री गणपत्यथर्वशीर्ष प्रारंभः

।।श्री गणेशाय नमः।।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।।
स्थिरैरंगैस्तुष्टवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।
ॐ स्वस्ति न इंद्रो वृध्दस्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।।
स्वस्तिनस्तार्क्षो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।।
ॐ शांतिः! शांतिः! शांतिः!



।।श्री गणेशाय नमः।।

।।श्री गणपती अथर्वशीर्ष।।

ॐ कार उच्चारित आम्ही प्रार्थतो ।
कानी मंगल ऐकू हेच इच्छितो ।।
शुभचि पहावे सर्व असे वांछितो ।
स्तुति स्तोत्र सेवा घडवू पहातो ।
आयुष्य हे देवा तुम्हा अर्पितो ।।
करिल कल्याण हे सदा इन्द्र तो ।
मंगल वर्षेल हे संपन्न पूषा तो ।।
अरिष्टनेमी गरुड शुभ फले देतो ।
देवगुरु श्रेयास सदा उभवितो ।।
शांति शांति सर्वत्र सदा पहातो ।।

अथ श्री गणपत्यथर्वशीर्ष प्रारंभः

।।श्री गणेशाय नमः।।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।।
स्थिरैरंगैस्तुष्टवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।
ओम् स्वस्ति न इंद्रो वृध्दस्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्र्ववेदाः ।।
स्वस्तिनस्तार्क्षो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।।
ॐ शांतिः! शांतिः! शांतिः!



शुभ कानी सदे पडो । शुभ नयनी सदा दिसो ।।
स्तुति सेवा सदा घडो । देह देव कामी पडो ।।
कीर्तिवंत इन्द्र आणि संपन्न पूषा ।
मंगल आणि शुभ याची सदा असे ईषा ।
गरुडराज करो शुभ ही असे मनीषा ।
देवगुरू प्रसादो आम्हाला श्रेयसा ।।
शांति शांति सर्वत्र हीच एक ईषा ।।

।।अथ श्रीगणेशाथर्वशीर्ष
व्याख्यास्यामः।।

ॐ नमस्ते गणपतये ।।
त्वमेय प्रत्यक्षं तत्तमसि ।।
त्वमेय केवलं कर्ताऽसि ।।
त्वमेय केवलं धर्ताऽसि ।।
त्वमेय केवलं हर्ताऽसि ।।
त्वमेय सर्वं खल्विदं ब्रह्मासि ।।
त्वं साक्षादात्मासि नित्यम् ।।१।।

ॐ कारस्वरूपा घ्या हे नमन ।।
तत्त्वमसि महावाक्य तुम्हीच हे वचन ।।
तुम्हालागि जगताचे पाहताति जनन ।।
तुम्हालागि लागतसे याचेचि जतन ।।
तुम्हीच या सृष्टीचे दिसता संहरण ।।
हे सर्व ब्रह्म तुम्ही तुमचेच अवतरण ।।
अविनाशी आत्मतत्त्व तुमचीच असे खूण ।।१।।

ऋतं वच्मि ॥ सत्यं वच्मि ॥२॥
अव त्वं मां ॥ अव वक्तारं ॥
अव श्रोतारं ॥अव दातारं ॥
अव धातारं॥ अवानुचानमव शिष्यं॥
अव पश्र्चात्तात् ॥ अव पुरस्तात् ॥
अवोत्तरात्तात् ॥ अव दक्षिणात्तात् ॥
अव चोर्ध्वात्तात् ॥ अवाधरात्तात् ॥
सर्वतो मां पाहि पाहि समंतात् ॥३॥

सत्य हेच अबाधित सत्य बोलतो मी ।।२।।
रक्ष मज वदतो तव रूप रक्ष स्वामी ।।
गुणश्रवणा रक्ष मज दान द्यावया रक्ष ।।
रक्ष उपासक तव मज मी या शिष्या रक्ष ।।
रक्ष पूर्व पश्चिमेत रक्ष दक्षिणोत्तरात ।।
रक्ष वरी आणि खाली रक्ष आसमंतात ।।३।।

त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः ॥
त्मानंदमयस्त्वं ब्रह्ममयः ॥
त्वं सच्चिदानंदाद्वितियोऽसि ॥
त्वं प्रत्यक्षं ब्रह्माऽसि ॥
त्वं ज्ञानमयो विज्ञानसयोऽसि ॥४॥
सर्वं जगदिदं त्वत्तो जायते ॥
सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ॥
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति ॥
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ॥
त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः ॥
त्वं चत्वारि वाक्पदानि ॥५॥

तू वाचा असशी ती चित्त जीव साचा ।।
तू भरुनि आनंद तूचि असे ब्रह्मकंद ।।
तू आदितत्त्व आनंद तूच रूप चैतन्य ।।
तूच सत्यब्रह्म स्वतः उभा असा अद्वितीय ।।
ज्ञानविज्ञान तुझ्या ठायी असे एकरूप ।।४।।
जग उपजे तुज ठायी तुज ठायी ते वसते ।।
लय त्याची तवस्थळी तुज ठायी ते परते ।।
धरा धारा अनल अनिल गगन रूप हे तुझे ।।
परा आदि वाचा ही आविष्कार हा तुझा ।।५।।

त्वं गुणत्रयातीतः ॥

त्वंत्मवस्थात्रयातीतः ॥

त्व देहत्रयातीतः॥ त्वं
कालत्रयातीतः॥

त्वं मूलाधातस्थितोऽसि नित्यं॥

त्वं शक्तित्रयात्मकः ॥

त्वां योगिनो ध्यायंति नित्यं॥

त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्तं त्वं रुद्रस्त्वं
इंद्रस्त्वं॥

अग्निस्तवं वायुस्त्वं सूर्यस्त्वं
चंद्रमास्त्वं॥

ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ॥६॥

तू यांच्या पार जे सत्त्व रज तम गुण ।।

तू यांच्या पलीकडे अवस्था ज्या तीन ।।

देह स्थूल सूक्ष्म आनंद भूत भव वर्तमान ।।

देही जे मूलाधार तेथ तुझे असे स्थान ।।

तूच शक्ति तू करितो लय स्थिति उत्पन्न ।।

तुज योगी नित्य ध्याती करिती तव स्तवन ।।

चतुर्मुख तू विष्णु महेश तू तू इन्द्र ।।

अनलानिल आणि सूर्य तू तूचि चंद्र ।।

ओंकाररूप तूचि पृथ्वि स्वर्ग ब्रह्म ।।६।।

गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरं ॥
अनुस्वारः परतरः ॥
अर्धेन्दुलसितं ॥ तारेण ऋध्दं ॥
एतत्तव मनुस्वरूपं ॥
गकारः पूर्वरूप ॥ अकारो मध्यमरूपं ॥
अनुस्वरश्र्चांत्यरूपं ॥
बिंदुरुत्तररूपं ॥ नादः संधानं ॥
संहिता संधिः ॥
सैषा गणेशविद्या गणकऋषिः ॥
निचृद्गायत्री छंदः ॥ गणपतिर्देवता ॥
ॐ गँ गणपतये नमः ॥७॥

आदिगण आदिवर्ण तयावरि चंद्रबिंदू ॥
सगुण तुझे रूप आता ओंकारासहित वदू ॥
ग आधी अ नंतर शेवटास अनुस्वार ॥
बिंदूसह मेळवून प्रणवासह उच्चार ॥
हीच गणेशविद्या ऋषि तिचे गणक हो ॥
छंद निचृद्गायत्रि देवता गणपति अहो ॥
"ॐ गं" जपावयास म्हणू "गणपतये नम" ॥
हाच मंत्र हाच घोष राहतो सदा महा ॥७॥

एकदंताय विद्महे ।

वक्रतुण्डाय धीमहि ।

तन्नो दंति प्रचोदयात् ।।८।।

ज्ञात आम्हा एकदंत ।

वक्रतुण्ड ध्यानात ।

तो दंति सदा आम्हा राहो प्रेरणा देत ।।८।।

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ॥
रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ॥
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ।
रक्तगंधानुलिप्तांगं
रक्तपुष्पैः सुपूजितम् ॥
भक्तानुकंपिनं देवं
जगत्कारणमच्युतम् ॥
आविर्भूतं च सृष्ट्यादौ ।
प्रकृतेः पुरुषात्परम् ॥
एवं ध्यायति यो नित्यं ।
स योगी योगिनां वरः ॥९॥

एक दात चार हात पाश वरिल हातात ।।
वाम हस्ति अंकुश तसा वामीच हस्तिदंत ।।
उभविला वरदहस्त उजवा त्याचा हात ।।
ध्वजी विराजे मूषक भव्य उदर कांति रक्त ।।
सूक्ष्म श्रवणा कर्ण भव्य वस्त्रे ती ताम्र दिव्य ।।
उटी रक्तचंदनाची रक्त कुसुमांची पूजा ।।
भक्तांना सदा प्रसन्न जगता करी उत्पन्न ।।
अवतारी जगत्पूर्व जीव माया पर असे ।।
ध्यान याचे करि योगी तोचि सर्वांपर असे ।।९।।

नमो व्रातपतये । नमो गणपतये ।
नमः प्रमथपतये ।।
नमस्तेस्तु लंबोदरायैकदंताय
विघ्ननाशिने शिवसुताय ।।
श्री वरदमूर्तये नमो नमः ।।१०।।

व्रातपती प्रमथपती गणपती नमो नमो ।।
लंबोदर एकदंत विघ्ननाशक नमो नमो ।।
शिवकुमारा नमन वरदमूर्ति नमो नमो ।।१०।।

एतदथर्वशीर्षं योऽधीते स ब्रह्मभूयाय कल्पते॥
स सर्वतः सुखमेधते स सर्वविघ्नैर्न बाध्यते ॥
स पंचमहापापात्प्रमुच्यते ॥
सायमधियानो दिवसकृतं पापं नाशयति॥
प्रातरधियानो रात्रिकृतं पापं नाशयति।
सायंप्रातः प्रयुञ्जानो अपापो भवति॥
सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति ॥
धर्मार्थकाममोक्षं च विंदति ॥
इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ॥
यो यदि मोहाद्दास्ति स पापीयान् भवति।
सहस्रावर्तनात् यं यं काममधीते
तं तमनेन साधयेत् ॥११॥

अथर्वशीर्षा जो अभ्यासी तो जाई ब्रह्मरूपाला ॥
त्यास लाभते सुखसर्वस्व विघ्न न बाधे त्याला ॥
पंचपापे त्या न शिवती मुक्ति त्यातून त्याजला ॥
संध्यासमयी करिता पाठ पापे जळती दिवसाची॥
पहाटवेळी मुखे मुखरता पापे जळती रात्रीची ॥
सांज सकाळी ज्याचे पठन अपापित्व हो त्याची॥
सर्व ठिकाणी करिता पाठ चिंता नाही विघ्नाची ॥
त्यास खास मिळतील फळे धर्मार्थकाममोक्षाची॥
देऊ नका खोट्या शिष्याला, द्याल,
व्हाल धनि पापाचे ॥
अथर्वशीर्ष सहस्रवेळा म्हणा
ईप्सित साध्याचे ॥११॥

अनेन गणपतिमभिषिंचति
स वाग्मी भवति ।।
चतुर्थ्यामनश्नन् जपति
स विद्यावान् भवति ।।
इत्यथर्णव वाक्यं ।
ब्रह्माद्यावरणं विद्यात्
न बिभेति कदाचनेति ।।१२।।



अभिषेकाने उत्तम वक्ता
विद्यावान चतुर्थीव्रता ।।
ऋषि अथर्णव वदती बनती
निर्भय ब्रह्मा जाणता ।।१२।।

यो दुर्वांकुरैर्यजति
स वैश्रवणोपमो भवति ।।
यो लाजैर्यजति स यशोवान् भवति ।
स मेधावान् भवति ।।
यो मोदकसहस्रेण यजति
स वाञ्छितफलमवाप्नेति ।।
यः साज्यसमिद्भिर्यजति
स सर्वं लभते, स सर्वं लभते ।।१३।।

दुर्वदळांनी पूजा करिता
मिळेल पहा धनसंपदा ।।
पूजा लाह्यांनी करिता
त्या प्राप्त असे यश बुध्दि ।।
होमी हजार मोदक त्याला
ईप्सित फलसिध्दि ।।
घृतसमिधांचा यज्ञ करी
त्या सर्वा सर्वांची प्राप्ति ।।१३।।

अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा
सूर्यवर्चस्वी भवति ।।
सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ
वा जप्त्वा सिध्दमंत्रो भवति ।।
महाविघ्नात्प्रमुच्यते ।
महादोषात्प्रमुच्यते ।
महापापात्प्रमुच्यते ।।
स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति ।।
य एवं इत्युपनिषद् ।।१४।।

आठ द्विजांना दिक्षा देतो सूर्यतेज तो मिळवितो ॥
सूर्यग्रहणे नदीकिनारी वा देवापाशी जपतो ॥
"सिध्दमंत्र" तो अथर्वशीर्षा जपा जपूनि होतो ॥
घोरपापे महाविघ्ने सुटती महादोष त्याचे ॥
सर्व विद्या सर्व ज्ञाने प्राप्त होती या पठने॥
म्हणून म्हणती यास वेद संपन्न हे उपनिषद॥१४॥

ॐ सहनाववतु ।।

सहनौ भुनक्तु ।।

सहवीर्यं करवावहै ।।

तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ।।

देवा तू आमुचा रक्षक पोषक ।।

तुझ्यामुळे आम्ही होऊ ज्ञानवंत ।।

तुझिया अभ्यासे मिळे तेज आम्हा ।।

ॐकार उच्चारे द्वेष नुरो आम्हा ।।

देवा आम्हा रक्ष उभयता।।

तूच आमुचा पोषणकर्ता ।।

समर्थ ज्ञानी आम्ही होऊ ।।

अभ्यासे तेजाला मिरवू ।।

द्वेषवाद तो कधी न उरवू ।।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।।
स्थिरैरंगैस्तुष्टवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।

ॐ कार उच्चारित आम्ही प्रार्थतो ।
कानी मंगल ऐकू हेच इच्छितो ।।
शुभचि पहावे सर्व असे वांछितो ।
स्तुति स्तोत्र सेवा घडवू पहातो ।
आयुष्य हे देवा तुम्हा अर्पितो ।।

ॐ स्वस्ति न इंद्रो वृध्दस्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्र्ववेदाः ।।
स्वस्तिनस्तार्क्षो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।।

**ॐ शांतिः! शांतिः! शांतिः!**

करिल कल्याण हे सदा इन्द्र तो ।
मंगल वर्षेल हे संपन्न पूषा तो ।।
अरिष्टनेमी गरुड शुभ फले देतो ।
देवगुरु श्रेयास सदा उभवितो ।।

**शांति शांति सर्वत्र सदा पहातो ।।**

पुस्तक म्हणजे असतं तरी काय? वाचन का करावे?

तुम्ही एकदा असा विचार करून बघा. आपल्या आजुबाजूला अंगमेहनतीची, त्रासाची, कधी कधी किळस येईल अशी तर कधी धोक्याची कामं करणारी माणसं आपण पहातो. त्यांना ती कामं का करावी लागतात? त्यांना वाटत नाही का की AC मध्ये बसून मस्त आराम करावा? पण शिक्षणाच्या अभावी त्यांना ती करावी लागतात. आणि शिक्षण म्हणजे काय? एक तर पुस्तकं वाचणं किंवा ज्यांनी पुस्तकं वाचली अशांकडून ऐकणं, पहाणं. आपल्यात आणि वर उल्लेख केलेल्या लोकांत फ़रक काय असेल तर पुस्तकांचा. आणि म्हणून म्हणतात की पुस्तकं हे गुरू, मित्र आणि मार्गदर्शक असतात. पुस्तकांवर प्रेम करा. वाचा. आत्मसात करा. तुमची जगाकडे पहाण्याची नजर बदलेल. आणि जगाची तुमच्याकडे पहाण्याची नजर बदलेल.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. आपल्या आजूबाजूला वाचक तयार करूया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट  अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

आम्ही बि घडलो

तुम्ही बि घडाना

वाचनाने माणूस सर्वार्थाने श्रीमंत होतो.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.